Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
Date – 25 March 2024
Time 18.10 to 18.20
Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**
**प्रादेशिक बातम्या**
**दिनांक – २५ मार्च २०२४ सायंकाळी ६.१०**

****

- धुलिवंदनाचा सण सर्वत्र पारंपरिक पद्धतीनं जल्लोषात साजरा
- निवडणूक साहित्यासाठी कागदाचा कमीत कमी वापर करण्याचे आयोगाचे निर्देश
- तुळजापूर नगर परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांचं आई-वडिलांना मतदान करण्याबाबत भावनिक पत्र

आणि

- ७०व्या वरिष्ठ पुरुष गट राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत रेल्वे संघाला नमवत हरियाणाला विजेतेपद पटकावलं

****

धुलिवंदनाचा सण आज सर्वत्र पारंपरिक पद्धतीनं जल्लोषात साजरा करण्यात आला. अयोध्येत राममंदिर उभारणीनंतर प्रथमच धुलिवंदन साजरं होत असल्यानं, भाविकांच्या उत्साहाला उधाण आलं होतं. परंपरेनुसार आज मंदिरात रामाला अबीर गुलाल अर्पण करून रंग खेळण्याची परवानगी मागण्यात आली, आणि त्यानंतर संपूर्ण अयोध्यावासिय रंगोत्सवाच्या आनंदात तल्लीन झाले. मथुरा आणि वृंदावनातही आज रंगोत्सव पारंपरिक पद्धतीने उत्साहात साजरा झाला.

महाराष्ट्रात सर्वत्र मोठ्या आनंदात धूलिवंदनाचा सण साजरा करण्यात आला.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह राजकीय नेत्यांनी ठाण्यातील टेंभी नाक्यावर मोठया जल्लोषात धुलीवंदन साजरं केलं. नैसर्गिक रंगांचा वापर करत होळी साजरी करा, असं आवाहन करत मुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी ठाणेकरांसह राज्यातील जनतेला शुभेच्छा दिल्या.

यवतमाळ जिल्ह्यात बंजारा समाजानं पारंपरिक गाण्यांच्या ठेक्यावर लेंगी नृत्य करत होळी साजरी केली. वाशिम जिल्ह्यात सर्वत्र रंगाचा सण रंगपंचमी मोठ्या हर्षोल्हासात साजरा होत आहे. बंजारा तांड्यातील महिलांनी पारंपारिक पोशाख परिधान करून डफलीच्या तालावर नृत्य करीत धुळवड साजरी केली, बंजारा समाजाची काशी असलेल्या पोहरादेवी इथं जगदंबा देवी संस्थानावर आज होळी सण मोठ्या उत्साहात पार पडला. आज पहाटे चार वाजता वाजतगाजत होलिका दहन करण्यात आलं. आज दिवसभर बंजारा बोली भाषेतल्या गाण्यांवर, डफाच्या तालावर नृत्य करत बंजारा महिला पुरुषांनी रंगोत्सव साजरा केला.
बुलडाणा जिल्ह्यातही सर्व स्तरातून धुलिवंदन साजरं होत आहे. बंजारा समाजातही हा उत्सव मोठ्या थाटामाटात साजरा होत असल्याचं दिसून आलं.
नंदुरबारमध्ये आदिवासी काठी संस्थानाचा रजवाडी होळी उत्सव पार पडला.

हिंगोली जिल्ह्यात कळमनुरी तालुक्यातल्या रामेश्वर तांडा इथं बंजारा समाजाच्या पारंपारिक रितीरिवाजाप्रमाणे होळी सण साजरा करण्यात आला.
जालना जिल्ह्यात धुलिवंदन हा सण १३५ वर्षांच्या अनोख्या परंपरेनुसार साजरा करण्यात आला. या परंपरेनुसार रिसाला समितीच्या वतीने प्रतिकात्मक हत्तीवरून राजाची वाजत गाजत मिरवणूक काढण्यात आली. शहरातल्या वेगवेगळ्या भागातून जाणाऱ्या या हत्तीवर फुलांची उधळण केली जाते. त्यानंतर हत्तीवर बसलेला प्रतिकात्मक राजा नागरिकांना प्रसाद म्हणून रेवड्यांचं वाटप करतो. ही मिरवणूक शहरभरातून मार्गक्रमण करते, आपल्या भागातून मिरवणूक गेल्यावर नागरिक रंग खेळणं थांबवतात, आजही ही प्रथा पाळण्यात आली.
छत्रपती संभाजीनगरातही धुलिवंदनाचा सण सर्वत्र जल्लोषात साजरा झाला.
नांदेड जिल्ह्यात होळीपाठोपाठ धुलिवंदनाचा सण उत्साहात साजरा झाला. रंगोत्सवात आबालवृद्ध जल्लोषात सहभागी झाले. या पार्श्वभूमीवर कुठेही अनुचित प्रकार घडू नये यासाठी सिडको भागात पोलिसांनी आज पथसंचलन केलं. सर्वांनी शांतता ठेवण्याचं आवाहन यावेळी करण्यात आलं.

****

येत्या शैक्षणिक सत्रात राज्यात पहिली ते आठवीच्या, ४४ लाख ६० हजार विद्यार्थ्यांना प्रत्येकी दोन गणवेशांचं वाटप करण्यात येणार आहे. यात एक नियमित गणवेश तर दुसरा स्काउट गाईडचा गणवेश असेल. महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेकडून याबाबतचा `कार्यारंभ` आदेश देण्यात आला असून बचत गटातील महिलांकडून हे गणवेश शिवून घेण्यात येणार आहेत. प्रत्येक विद्यार्थ्याला गणवेशासाठी लागणारं ठराविक माप महिला आर्थिक विकास महामंडळाकडून नोंदवलं जाईल. एक गणवेश शिवून देण्यासाठी बचत गटांना ११० रुपये याप्रमाणे मोबदला दिला जाणार आहे.

****

यावर्षी जानेवारी महिन्यात कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेकडे सुमारे आठ लाख नवीन सदस्यांची नोंदणी झाली. यामध्ये १८ ते २५ वर्ष वयोगटातल्या सदस्यांची संख्या लक्षणीय असून, महिला सदस्यांची संख्या दोन लाखांहून अधिक आहे.

****

भारत बायोटेक इंटरनॅशनल लिमिटेड या लस बनवणाऱ्या कंपनीने भारतात प्रौढांवर क्षयरोग प्रतिबंधक लसीच्या म्हणजे एम टी बी व्हॅंकच्या चाचण्या सुरू केल्या आहेत. बायोफॅब्री या स्पॅनिश बायो फार्मास्युटिकल कंपनीने मानवी स्त्रोताकडून मिळवलेली, ही क्षयरोग प्रतिबंधावरील पहिली लस आहे. या चाचण्या बायोफॅब्रिच्या सहकार्याने केल्या असल्याचं कंपनीने म्हटलं आहे. एचआयव्ही संक्रमित नसणाऱ्या प्रौढांमध्ये या लसीची मात्रा यापूर्वीच दिली असून, एम टी बी व्हॅंक ही लस सुरक्षित आहे की नाही हे निर्धारित करण्यासाठी आता एचआयव्ही बाधित प्रौढांना ही लस देऊन त्याच्या दुसऱ्या टप्प्याचा अभ्यास सुरू करण्यात आला असल्याचंही कंपनीने म्हटलं आहे.

****

केंद्रीय निवडणूक आयोगाने निवडणूक यंत्रणा आणि राजकीय पक्षांना, मतदार यादी आणि निवडणूक साहित्यासाठी कागदाचा कमीत कमी वापर करण्याचे निर्देश दिले आहेत. मतदान मंडळाने ई-पुस्तकं आणि ई-दस्तऐवजांच्या वापरावर अधिक भर दिला आहे. मतदानादरम्यान इलेक्ट्रॉनिक पद्धतीला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशानं हे निर्देश जारी करण्यात आले. एकेरी वापराच्या प्लास्टिकचा वापर पूर्णपणे टाळण्याचं

आवाहन आयोगाने केलं आहे. राजकीय पक्षांना प्रचार कार्यक्रमांसाठी अक्षय ऊर्जा वापरास प्रोत्साहन देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

****

धाराशिव जिल्ह्यात तुळजापूर नगर परिषदेच्या प्राथमिक शाळा क्रमांक २ च्या विद्यार्थ्यांनी आपल्या आई-वडिलांना लोकसभा निवडणुकीत मतदान करण्याबाबत भावनिक साद घालणारं पत्र लिहिलं आहे. लोकशाहीचं महत्त्व, मतदानाचं महत्त्व, आपलं कर्तव्य याविषयी माहिती देऊन आई-वडिलांनी वेळात वेळ काढून मतदान करावं, असं आवाहन विद्यार्थ्यांनी या पत्रातून केलं आहे. या पत्रलेखनासाठी मुख्याध्यापक गणेश रोचकरी, यांच्यासह सुरजमल शेटे, सुज्ञानी गिराम, केरण लोहारे, महेंद्र कावरे या शिक्षकवर्गाने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केलं. ४५ विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सहभाग नोंदवला.

****

७०व्या वरिष्ठ पुरुष गट राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत हरियाणा संघानं रेल्वे संघाचा पराभव करत विजेतेपद पटकावलं आहे. अहमदनगर जिल्ह्यातल्या वाडिया पार्क क्रीडा संकुलावर आज हा अंतिम सामना झाला. यावेळी हरियाणाच्या आशू मलिकने रेल्वे संघाचे शेवटचे दोन गडी टिपत ३५-३० अशा विजय मिळवत, चांदीचा चषक उंचावला. हॉकीचे आंतरराष्ट्रीय खेळाडू धनराज पिल्ले यांच्या हस्ते या स्पर्धेचं बक्षीस वितरण करण्यात आलं.

****

भंडारा जिल्ह्यात वाघाच्या हल्ल्यात एक महिला ठार झाली. पवनी तालुक्यात कन्हाळगाव इथं ही घटना घडली. सीताबाई दडमल असं या ६० वर्षीय महिलेचं नाव असून, ही महिला गावाशेजारी असलेल्या शेतात मोहफुल गोळा करण्यासाठी गेली असता वाघाने तिच्यावर हल्ला केला. वन विभागाने वाघाचा तात्काळ बंदोबस्त करावा अशी मागणी गावकरी करत आहेत.

****

अहमदनगर जिल्ह्यात एका इसमाने संशयाच्या कारणास्तव आपल्या पत्नीसह दोन मुलींना जिवंत जाळल्याचा प्रकार समोर आला आहे. पिंपळगाव लांडगा इथं आज सकाळी नऊ वाजता ही घटना घडली. पत्नी लिलाबाई लांडगे आणि दोन मुली घरात असताना दारूच्या नशेत पती सुनील लांडगे यांनी तिघींच्या अंगावर रॉकेल

टाकून त्यांना जिवंत जाळले. या प्रकरणी आरोपी सुनील लांडगे याला ताब्यात घेत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

****

मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर एका परदेशी महिलेला कोकेन तस्करी प्रकरणी अटक करण्यात आली आहे. ही महिला नैरोबीहून मुंबई विमानतळावर आली होती. तिच्याकडे असलेले सामान संशयास्पद असल्याचं आढळून आल्यानंतर सामानाची झडती घेण्यात आली. त्यातून जवळपास १९ कोटी रुपयांचं कोकेन जप्त करण्यात आलं आहे. याप्रकरणी सदर महिलेची न्यायालयीन कोठडीत रवानगी करण्यात आली आहे.

****

रत्नागिरी जिल्ह्यात राजापुर इथं सहा महिन्यांनंतर आज पुन्हा गंगा अवतरली. काशिकुंडासह चौदाही कुंडांमध्ये गंगेचं पाणी प्रवाहित झालं. गंगा देवस्थानच्या अध्यक्षांनी ही माहिती दिली. राजापूरमध्ये गंगा अवतरल्यानंतर अनेक ठिकाणांहून भाविक गंगास्नानासाठी येत असतात. २०१३ पूर्वी साधारण तीन वर्षांच्या कालावधीनंतर हे पाणी प्रवाहित होत असे, मात्र त्यानंतर जवळपास दर वर्षी पाणी प्रवाहित होत आहे. भूगर्भातली विशिष्ट रचना, हालचाली किंवा सायफनसारख्या यंत्रणेमुळे हे घडत असल्याचं अनेक भूगर्भशास्त्रज्ञांचं मत आहे.

****

होळी सणाच्या अनुषंगाने राज्य उत्पादन शुल्क विभागाने धुळे तालुक्यातल्या आर्णी आणि धनगरवाडी इथल्या अवैध हातभट्टी निर्मिती केंद्रावर छापेमारी करून एकूण १४ हातभट्टी निर्मिती केंद्र उध्वस्त केले. याप्रकरणी एकूण १५ गुन्हे नोंदवण्यात आले असून, १३ आरोपींना अटक करण्यात आली आहे. या कारवाहीमध्ये एकूण पाच लाख २९ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

****